# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१७

**वेळ: ३ तास** **एकूण गुण: ८०**

## विभाग १ – गदय

**कृ.१.(अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. तक्ता पूर्ण करा. **[२]**

| बाजीराव पेशवा यांनी लिहिलेल्या पत्राचा दिनांक | बाजी भिंवराव यांचा मृत्युदिन | बाजी भिंवराव यांच्या मृत्युचे कारण | बाजी भिंवराव यांच्या मृत्युचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | | | |

११ जानेवारी, १७३९
१६६० पौष व. १३

(बाजी रेठरेकर लढाईत पडल्याबद्दल बाजीराव पेशवा त्याच्या आईचे समाधान करीत आहेत.)

श्री

गंगाजान्हवीसमान मातुश्री वेणूबाई काकी वडिलांचे सेवेसी :-

अपत्ये बाजीराव बल्लाळ साष्टांग नमस्कार वि।। येथील ता पौष वद्य १३ पावेतों स्वकीय लिहित जाणे. विशेष पौष शु।। ११ स तारापुरावर हल्ला केला ते समयीं बाजी भिंमराव तोंडांत गोळी लागून कैलासवासी जाहले. ईश्वरें मोठें अनुचित केलें! तुम्हास मोठा शोक प्राप्त जाला. आमचा तर भाऊ गेला त्यास, तुम्ही वडील. दु:खाचें परिमार्जन करून विवेक करावा. त्यांची मुलें व चिमणाजी आप्पा आहेत, त्यांचेहि त्याजपेक्षां अधिक चालेल. परंतु आमचा भाऊ गेला. बाजू गेली. त्यास, चिमणाजी भिंवराव हे पाठविले आहेत. हें सांगतील तें ऐकावें. सारांश, मीच तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा. मजवर दृष्टी द्यावी. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

२. i. योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा. **[१]**

बाजी रेठरेकरांच्या आईसाठी वापरलेले संबोधन ------------------

अ. कैलासवासी ब. तीर्थरूप

क. गंगाजान्हवीसमान ड. तीर्थस्वरूप

ii. फक्त नावे लिहा. **[१]**

बाजी रेठरेकर

वडील → ______ भाऊ → ______

**व्याकरण :**

३. i. खालील शब्दांतील विभक्ती ओळखा: **[१]**

तोंडात ⟶ ______ दु:खाचे ⟶ ______

ii. राजेशचे वागणे सरांना <u>अयोग्य</u> वाटले. **[१]**

(अधोरेखित शब्दाच्या जागी उताऱ्यात आलेल्या योग्य शब्दाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.)

**माझे मत :**

४. बाजीराव पेशवा यांची राज्यकर्ता म्हणून तुम्हांला समजलेली गुणवैशिष्ट्ये ८ ते १० वाक्यांत लिहा. **[२]**

**कृ.१.(ब) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. प्रत्येकी एका वाक्यात उत्तर द्या.

i. पावसाने माझा विश्वासघात केला असे लेखक का म्हणतात? **[१]**

ii. लेखकाच्या आयुष्यातील सुवर्णस्मृती कोणती? **[१]**

पण या पावसाने माझा विश्वासघात केला, तो एकोणीसशे एकाहत्तर साली. आतापर्यंत माझा समज असा होता, की जून उजाडला, की पाऊस सुरू होतोच. 'नेमेचि येतो मग पावसाळा' अशीच अवस्था असणे अपरिहार्य आहे, असं वाटायचं. पण १९७१ साली मात्र माझे सगळे समज पावसाने खोटे ठरवले. ढग आकाशात दाटून यायचे, वाटायचे, की आता पाऊस कोसळतोच! पण कसचे काय; बघता बघता सगळा पावसाळा संपला, पण पाऊसच पडला नाही. त्याहीपेक्षा भयानक गोष्ट म्हणजे पुढची दोन-तीन वर्षे पाऊसच पडला नाही. अख्खा मराठवाडा आणि महाराष्ट्राचा काही भाग अक्षरश: दुष्काळात होरपळून निघाला. माझ्या आयुष्यात अनुभवलेला हा पहिला दुष्काळ होता. महाराष्ट्रात यापूर्वी दुष्काळ पडले नव्हते असे नाही. मी लहान असताना एकोणीसशे बावन्न साली मोठा दुष्काळ पडला होता म्हणे. आमचं सारं कुटुंब बरबडा खाऊन जगून निघालं होतं त्या दुष्काळात; पण त्या दुष्काळाचं मला फारसं काही आठवत नाही. एकाहत्तरपासून सुरू झालेला दुष्काळ मात्र भीषण होता. खेड्यापाड्यांतून बीडला शिकायला आलेल्या पोरांना उपाशी राहण्याशिवाय काही मार्ग नव्हता. यावर मार्ग म्हणून गावातल्या काही प्रतिष्ठितांनी आणि काही शिक्षकांनी धान्य गोळा करून पोरांना खाऊ घातलं होतं. ही एक या काळातली माझ्या आयुष्यातली सुवर्णस्मृती! .............. पण पाऊस पडलाच नाही.

२. i. असत्य विधान ओळखा. **[१]**

१९७१ च्या दुष्काळाची वैशिष्ट्ये -

अ. ढग आकाशात दाटून यायचे.

ब. प्रचंड पाऊस कोसळायचा.

क. मराठवाडा होरपळून निघाला.

ड. अजिबातच पाऊस पडला नाही.

ii. सत्य विधान ओळखा. **[१]**

अ. लेखकाचे कुटुंब १९५२ च्या दुष्काळात बरबडा खाऊन जगले.

ब. दुष्काळामुळे लेखकाचे कुटुंब स्थलांतरित झाले.

क. १९५२ च्या पावसाने लेखकाचा विश्वासघात केला.

ड. १९५२ चा दुष्काळ लेखकाच्या स्मरणात राहिला.

**व्याकरण :**

३. i. सहसंबंध लक्षात घेऊन पुढील चौकटी भरा. **[१]**

अ. तीन : वर्षे : : [      ] : कुटुंब

ब. भीषण : दुष्काळ : : [      ] : गोष्ट

ii. परिच्छेदात आलेले कोणतेही दोन सामासिक शब्द शोधून लिहा. **[१]**

**माझे मत :**

४. तुम्ही अनुभवलेल्या पावसाचे वर्णन तुमच्या शब्दांत ८ ते १० वाक्यांत लिहा. **[२]**

**कृ.१.(क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. कोष्टक पूर्ण करा. **[१]**

i. [      ] ← संवादातील घटक → [      ]

ii. फोनवरून संवाद साधणाऱ्यांचे विशेष [१]

| | |
|---|---|
| | |

'संवाद' हे दोन जीवांना जोडणारे अत्यंत प्रभावी साधन आहे. संवाद साधण्याची कला माणसालाच अवगत आहे. संवादात शब्द असतात, भावना असतात, भावनांचे पाझर असतात, प्रहार असतात. आपण लहान मुलांपासून ते वरिष्ठांपर्यंत अनेकांशी संवाद साधत असतो. प्रसंगपरत्वे, व्यक्तिपरत्वे संवादातील शब्दांची लय बदलत असते. संवादातील शब्दांच्या पाठीमागे ते उच्चारणाऱ्याचं व्यक्तिमत्त्व उभे असते. अगदी फोनवरून 'हैलो' उच्चारताना काही माणसं असा लांबलचक सूर आळवतात, की ऐकणाऱ्याला हसू येते किंवा काही माणसं अशा दांडग्या आवाजात प्रतिसाद देतात, की शेजारच्याला वाटते, याने फोन बाजूला करून संभाषण केले, तरी फोन करणाऱ्याला ते थेट ऐकू जाईल. 'शब्द' ही मुळातच एक विलक्षण शक्ती आहे. त्यात उत्कटता असते, भव्यता असते. सौंदर्य असते.

२. संवादाचे तुम्हांला जाणवलेले महत्त्व तुमच्या अनुभवाच्या आधारे लिहा. [२]

## विभाग २ – पद्य

**कृ.२.(अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i. सहसंबंध लिहा. [१]

अ. संकट : धैर्य : : ______ : सहिष्णुता

ब. सभा : ______ : : युद्ध : शौर्य

ii. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. [१]

अ. प्रस्तुत कवितेतील सज्जन पुरुषाच्या अंगी ------------------- असतात.

(नैसर्गिक , स्वाभाविक, सार्वत्रिक, वैयक्तिक)

ब. सज्जन पुरुष ------------------- च्या व्यसनात रममाण होतो.

(विद्या, ज्ञान, स्वकीर्ती, शौर्य)

विपत्काळीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें।
सभे पांडित्याचा प्रसर, समरी शौर्य मिरवे।।
स्व-किर्तीच्या ठायी प्रचुर, रति विद्या-व्यसन जें।
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे।।१।।

ज्यांची देह-मनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं।
कीं ज्यांहीं स्व-कृतोपकार-विभवें सर्वत्र विस्तारिलीं।।
लोकांचे परमाणु-तुल्य गुण जे मेरूपरी वानिती।
चित्तीं तोषहि पावती सु-जन ते नेणों किती नांदती।।२।।

२. i. 'मेरू पर्वत' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. [१]

ii. कोष्टक पूर्ण करा. [१]

पुण्यामृताने भरलेली

| | |
|---|---|
| | |

३. 'विपत्काळीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें।' या ओळीचा सरळ अर्थ सांगून समर्पक उदाहरणे द्या. [२]

४. 'लोकांचे परमाणु-तुल्य गुण जे मेरूपरी वानिती।' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा. [२]

**कृ.२.(ब) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i. आकृतिबंध पूर्ण करा. **[१]**

मानवी भावनांचा आरोप केलेले निसर्गातील घटक

- [ ]
- [ ]

ii. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. **[१]**

अ. ------------------ क्षितिजापाशी दिसत आहे.

(विजेचे झाड, इंद्रधनुष्य, काळेकुट्ट ढग, वसुंधरा)

ब. आभाळाच्या डोळ्यांमधले थेंब म्हणजे ------------------ .

(मोत्याचे टिळे, पावसाचे थेंब, निळे गोल थेंब, लवलवणारी पाने)

पानावरती थेंब वाजती मातीमधुनी कोंब फुटे
नाजूक इवल्या चोचीतून अन् मल्हाराची धून उठे
लाल पोपटी कवळी पाने लवलवणारी जिथे तिथे
हिरवे पिवळे रंग त्यांमध्ये केशर सांडे कुठे कुठे
ओघळता या आभाळाच्या डोळ्यांमधले थेंब निळे
तरुवेलींच्या भाळावरती त्या मोत्यांचे गोल टिळे
क्षणात बघते लखलखणारे झाड विजेचे टकामका
अरे पिलांनो, पंखाखाली जा आईच्या लपा लपा
क्षितिजापाशी इंद्रधनूने कमान सुंदर वाकविता
ओलेत्याने टिपते डोळे वसुंधरा हसता हसता

२. कवितेच्या आधारे सहसंबंध ओळखून योग्य जोड्या लावा. **[२]**

माती, वीज, पर्ण, पिलं, आई, थेंब, ओली, कोंब, झाड

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| i. | | |
| ii. | | |
| iii. | | |
| iv. | | |

३. 'ओलेत्याने टिपते डोळे वसुंधरा हसता हसता.' या ओळीतील भावसौंदर्य स्पष्ट करा. **[२]**

४. **[२]**

क्षणात बघते लखलखणारे
झाड विजेचे टकामका

↓

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून स्पष्ट करा.

## विभाग ३ – स्थूलवाचन

**कृ.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[४]**

१. कवितेतील मुलासाठी 'रविवार म्हणजे कष्टाचा वार' हे विधान कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

२. कावीळ बरी होण्यासाठी गळ्यात वनस्पतींची माळ घालणे | या विषयावर

विजय ⇄ संवाद लिहा ⇄ डॉक्टर

३. 'निरंजन-आदर्श विद्यार्थी' या विधानाची समर्पकता खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.

i. निरंजनचा अभ्यास

ii. निरंजन व त्याचे गुरुजी

## विभाग ४ – व्याकरण

**कृ.४.(अ) अलंकार**

खालील लक्षणांचा अलंकार ओळखून त्याचे एक उदाहरण लिहा. **[२]**

उपमेयाचा निषेध → उपमेय → उपमानच आहे

अलंकार - ☐ उदाहरण - ☐

**(ब) समास**

खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखा व त्या समासाचे नाव लिहा. **[२]**

१. गरजूंना यथाशक्ती दान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

२. साहित्यसम्मेलनातील विविध कार्यक्रम पूर्ण एक सप्ताह सुरू होते.

**(क) शब्दसंपत्ती**

खालील शब्दांना 'ईक' प्रत्यय लावून योग्य शब्द तयार करा. **[१]**

१. विज्ञान – ☐

२. अर्थ – ☐

**(ड) पारिभाषिक शब्द**

खालील पारिभाषिक शब्दांना प्रमाणभाषेतील शब्द सांगा. **[१]**

१. Exhibition ------------------------------------

२. Supervisor ------------------------------------

**(इ) लेखननियमांनुसार लेखन**

खालील शब्दांमधील लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा. **[१]**

१. कवयित्री | कवयीत्री | कवयत्री | कवयत्रि

२. दात्रूत्व | दातृत्व | दातृत्त्व | दातरुत्व

**(ई) विरामचिन्हे**

खालील वाक्यातील चुकीचे विरामचिन्ह ओळखा व ते दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा. **[१]**

चिमण्यांनी घरटं बाधायचं तरी कुठं!

**(फ) वाक्प्रचार**

खालील वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा. **[२]**

संगोपन करणे | जमीन अस्मानाचा फरक असणे | जीव नकोसा होणे

खूप मोठे अंतर असणे | पालनपोषण करणे | मोठेपणा सांगणे

महती गाणे | वैतागून जाणे

कौतुक करणे

| | वाक्प्रचार | | अर्थ |
|---|---|---|---|
| (१) | | (१) | |
| (२) | | (२) | |
| (३) | | (३) | |
| (४) | | (४) | |

## विभाग ५ – उपयोजित लेखन

कृ.५.(अ)

**१. पत्रलेखन** **[५]**

खालील बातमी वाचा व त्याखालील कृती सोडवा.

**वृत्तपत्र**

**'नागरिक'**

आमच्या वार्ताहराकडून –

'चिवचिव' बालोद्यानासमोरील रस्त्याची अवस्था चिंतनीय –

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांची शक्यता

वाहनांची कोंडी आणि रहदारीला व्यत्यय

**सजग नागरिक या नात्याने**

बालोद्यानासमोरील नादुरुस्त रस्त्याबाबत परिसरातील मा. नगरसेवक यांचेकडे तक्रार करणारे पत्र लिहा.


**किंवा**

बालोद्यानासमोरील रस्ता दुरुस्त करण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.

**२. बोलीभाषेतील उतारा वाचून त्याखालील कृती सोडवा.** **[५]**

दांडातलं पाणी दांडतच आटून जाते. वाफा कोल्डा फटांग. हे बर्कताचं आस्तं त पैसा जाते कुठी तुमचा? हायल्या कावून नाई बांधून राह्यले शेतकरी. ते त सोडाच. पण हे निकस खाऊ खाऊ तुमीबी निकस होऊन जासाल हाळू हाळू. जाणूनबुजून रसायन हे. आन् रसायन का तग धरते का लय दिवस? भुई गळण धावून मरंल एक दिवस.

i. कृती पूर्ण करा: **[३]**




ii. तक्ता पूर्ण करा: **[२]**

| **बोलीभाषेतील शब्द** | **प्रमाणभाषेतील अर्थ** |
|---|---|
| फटांग | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | नापीक होऊन |
| बर्कतीचं | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | निकृष्ट |

**किंवा**

**वरील बोलीभाषेतील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.** **[५]**

३. **कथापूर्ती (शब्दमर्यादा ८० ते १००)** **[५]**

खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा.

[दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.]

रवी शाळेतील हुशार व गुणवंत विद्यार्थी. प्रेमळ व सर्वांना मदत करणारा म्हणून सर्वांचा लाडका होता. रवी इ. ५वी पासून दरवर्षी शाळेच्या नाटकात भाग घेत असे आणि रोख रकमेचे बक्षीसही मिळवीत असे.

यंदा रवीचे दहावीचे वर्ष. रवीला नवीन मित्र मिळाला होता. दुष्काळग्रस्त भागातून आर्थिक परिस्थितीमुळे मामाकडे शिक्षणासाठी आलेला सूरज रवीच्या शेजारी राहायला आला आणि अभिनयाची आवड व नाट्यप्रेम यांमुळे दोघांची घट्ट मैत्री झाली. सूरजला असलेली पैशांची गरज रवीपासून लपून राहिली नव्हती.

दरवर्षीप्रमाणे शाळेच्या स्नेहसंमेलनात होणाऱ्या नाट्यस्पर्धेची सूचना वर्गात आली. रवी भाग घेणार आणि रोख बक्षीसही पटकवणार हे ठरलेलेच होते जणू ! परंतु ..........

**(ब) खालील कृती सोडवा.**

१. **भावार्थ लेखन (गद्य आकलन)** **[५]**

दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा. (शब्दमर्यादा ४० ते ५० शब्द)

तरुण मित्रा, रक्त हे तुझे प्रतीक आहे. रक्ताचा थेंब म्हणजे तुझीच प्रतिमा ! रक्ताशिवाय चैतन्य संभवत नाही आणि चैतन्याशिवाय तारुण्य असूच शकत नाही. रक्ताचा आणि तुझा संबंध हा असा आहे. रक्ताचे मोठेपण तू आभाळाकडून, मातीकडून, पाण्याकडून शिकून घे आणि ज्यांना त्याची जेव्हा गरज लागेल तेव्हा त्यांना ते खुशाल देऊन टाक ! रक्ताला मुक्त करून टाक!

जगात आपण विविध तऱ्हेची वैविध्यता पाहतो. माणसा-माणसांतही फरक पाहतो; पण तरीही मित्रा, एक गोष्ट खरीच, की कुणाच्याही रक्ताचा रंग काही वेगवेगळा असत नाही. माणसाच्याच काय, पशूपक्ष्यांच्याही रक्ताचा रंग एकच असतो. लालच असतो. रक्त एकच असते. ते फक्त चैतन्य जाणते! चैतन्याशी एवढी एकरूपता कुणाचीच नसते!

म्हणून मित्रा, रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे!

अरे, रक्तदान हे प्राणदानच आहे!

२. **अभिप्राय लेखन (शब्दमर्यादा ६० ते ८०).** [५]

पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.

मी वाचलेले पुस्तक


- बाह्यरंग
  - पुस्तकाचे नाव
  - लेखक / लेखिका
  - मुखपृष्ठ, मलपृष्ठ
- अंतरंग
  - पुस्तकाचा वाङ्मय प्रकार
  - वर्ण्यविषय
  - संदेश

●पुस्तक आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.

वरील मुद्द्यांच्या आधारे तुम्ही वाचलेल्या पुस्तकाबाबत अभिप्राय लिहा.

**(क) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा ८० ते १००)**

१. **आत्मकथन:** [५]




**कृती** – वरील घटक (फळा) तुमच्याशी बोलतो आहे, अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहा.

२. **वैचारिक लेखन** [५]

**'वन्यजीव वाचवा अभियान'**

- नैसर्गिक संपत्तीने नटलेली भारतभूमी
- भूतदया
- गरज व महत्त्व
- पर्यावरणाचा समतोल

**कृती** – वरील मुद्द्यांच्या आधारे 'वन्यजीव वाचवा' या विषयावर लेखन करा.